नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

स्टेशन रोड, सदर, नागपूर ४४०००१
फोन नं. २५३३२०२,पी.बी.एक्स.नं. २५३१४३१, २५३१४३२, फॅक्स नं. ०७१२ २५३१४३१

क्रमांक : का.अभि.(नामप्रविप्रा)/ ५४६ नागपूर, दिनांक : २८/०६/२०१८

प्रति,

श्री. विशाल प्रेमलाल बावीसटाले
रा. न्यू बिनाकी मंगलवारी, इंदिरा गांधी नगर ,
नागपूर

विषय :— मौजा **भिलगाव** , खसरा क्रमांक **८९/१, (प.ह.न. १२अ) तह. कामठी,** जि. **नागपूर.** क्षेत्र **१.६४७ हे.आर. (१६४७४.४९३ चौ.मी.)** जागा **'निवासी'** प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चा कलम १८, ४४, ४५, ५८, ५९ अन्वये अभिन्यास मंजूरी बाबत.

संदर्भ :— आपला दिनांक **३०/०५/२०१८** रोजीचा अर्ज.

विषयांकित प्रकरणातील जागा **निवासी** वापरार्थ अभिन्यास मंजुरीसाठी उपरोक्त संदर्भांकित पत्र या कार्यालयाला प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये दिनांक ०५/०१/२०१८ रोजी शासनाने मंजुर केलेल्या विकास योजनेनुसार उक्त जागा **'निवासी —३, लगत १८.०मी.रूंद रस्ता'** या उपयोगाकरीता प्रस्तावित करण्यात आलेली आहे. योजनेतील तरतुदीनुसार या जागेत प्रस्तावित वापर अनुज्ञेय आहे. उक्त प्रस्तावास जागेवर भूखंडनिहाय आखणी करण्याकरीता दि. १५/०६/२०१८ ला मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे

प्रस्तावित अभिन्यासाची उपअधिक्षक, भूमी अभिलेख, **नागपूर (ग्रामीण)** यांचेकडून जागेवर आखणी करून घ्यावी. त्या आखणीनंतर जागेवर आखणी केल्याप्रमाणे काही फरक आढळल्यास त्याप्रमाणे अथवा फरक नसल्यास त्या आखणीनुसार सदर मोजणी नकाशाच्या चार प्रती जमीनधारक व वास्तुशास्त्रज्ञाचे स्वाक्षरीने या कार्यालयास अंतिम मंजुरीस्तव सादर कराव्यात.

कार्यकारी अभियंता—१
(विकास परवानगी कक्ष)
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

प्रतिलिपी —

१. **उपअधिक्षक भूमि अभिलेख, नागपूर (ग्रामीण) —** उक्त अभिन्यासाची मौक्यावर मोजणी करून आखणी करण्यासाठी. (अभिन्यास नकाशा २ प्रतींत) व आखणी नकाशाची प्रत आखणी झाल्यावर या कार्यालयाला अभिलेखासाठी पाठविण्यात यावी.

— स्वा. —
कार्यकारी अभियंता—१
(विकास परवानगी कक्ष)
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण